जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४५०          दिनांक - २१/०६/२०२३**

**कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर**

## मंदिरातील घंटा चोरी करणारा आरोपी कोंढवा पोलीसकडुन अटक

कोंढवा भागातील भैरवनाथ मंदिरामधुल घंटा चोरी गेल्याबाबत कोंढवा पोलीस ठाणे पुणे येथे गुरन.६२४/२०२३ भादंवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयातील अनोळखी आरोपी यांचा शोध घेण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संजय मोगले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संदिप भोसले यांनी सुचना दिल्या होत्या.

सदर सुचनाप्रमाणे तपास पथक अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे, हे यांच्यासह स्टाफ सह गुन्हयाच्या घटनास्थळाच्या आजुबाजुस असणाया सीसीटिव्हिच्या माध्यमातुन आरोपी याचा शोध घेत होतो.अनोळखी आरोपी याने रिक्षा मधुन घंटा चोरी करुन नेत असल्याचे सीसीटिव्हिच्या माध्यमातुन पोलीस अंमलदार सुहास मोरे, राहुल थोरात, राहुल रासगे यांनी निष्पन्न केले होते. सदर रिक्षा मालकाचा शोध घेवुन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याची रिक्षा ही **सोहेल इलियाज शेख, वय २५ वर्षे, रा.वडारवाडी, गोलंदाज चौक, शिवाजीनगर, पुणे** यास शिपने चालविण्यासाठी दिली असल्याचे सांगितले.

सदर आरोपी यांचा शोध घेत असताना तो लुल्लानगर भागात भाडे सोडण्यासाठी आल्याबाबत माहिती दि.२०/०६/२०२३ रोजी प्राप्त झाली होती. तेव्हा त्यास स्टाफच्या मदतीने पकडुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे चोरी बाबत तपास करता त्याने आर्थिक अडचण असल्याने घंटा चोरी केली असल्याचे सांगुन ती त्याच्याच रिक्षाच्या मागील बाजुस डिकीत लपवुन ठेवल्याचे सांगितले.नमुद आरोपी याने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली असुन पुढील तपास पोलीस अमंलदार रणजित शिंदे हे करीत आहे.

सदरील कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा मा. पोलीस उप आयुक्त परि.०५ पुणे शहर श्री.विक्रम देशमुख,मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग एस.बी. साळवे यांच्या मागदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष सोनवणे,सहा.पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे, पोलीस अंमलदार अमोल हिरवे, सुहास मोरे,राहुल थोरात, गणेश चिंचकर, अभिजीत रत्नपारखी, राहुल रासगे, विकास मरगळे, राहुल वझारी यांनी केली आहे.